महाराष्ट्र शासन

# सहसंचालक,तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, नागपूर

शासकिय तंत्रनिकेतन परिसर, सदर, नागपूर
दुरध्वनी क्रं.:- ०७१२-६४६५१४५/१४६,
Web Site :- www.rdtenagpur.org.in E-Mail :- ronagpur@dtemaharashtra.gov.in

क्रमांक :- तंशिस/विकाना/डीबीटी पोर्टल /शिष्य./२०२४-२५/ 1657 दिनांक:- 29 APR 2025

प्रति,
प्राचार्य /संचालक,
शासकीय,अनुदानित, खाजगी विनाअनुदानित व कायम विनाअनुदानित,
पदवी/पदव्युत्तर पदवी व पदविका संस्था,
नागपूर विभाग, नागपूर.

विषय:-मागासवर्गीय घटकातील विद्यार्थ्यांसाठी इतर मागास बहुजन कल्याण विभागाच्या क्र. शिवृत्ती-२०२३/प्र.क्र.१३५/शिक्षण-१ दि. २०/०९/२०२४ रोजीच्या शासन शुध्दीपत्रकाची प्रभावि अंमलबजावणी करण्याबाबत.

संदर्भ:-मा. संचालक,तंशिसं,म.रा. मुंबई यांचे कार्यासन क्र. १८/तंशिसं/डीबीटी/विकाप/२०२५/२४६ दि. २८/०४/२०२५.

उपरोक्त विषयांन्वये सर्व संस्था सुचित करण्यात येते की, इतर मागास बहुजन कल्याण विभाग, शासन शुध्दीपत्रक क्र. शिवृत्ती-२०२३/प्र.क्र.१३५/ शिक्षण-१ दि.२०/०९/२०२४ नुसार विमुक्त जमाती, इतर मागासर्व व विशेष मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांसाठी असलेली शिक्षण शुल्क व परीक्षा शुल्क प्रतिपुर्ती योजनाकरीता **नॉन-क्रिमिलेअर प्रमाणपत्र** (NCL) बंधनकारक करणेबाबत शासन मान्यता देण्यात आलेली आहे. (सोबत जोडलेल्या शासन निर्णयाचे अवलोकन करावे.)

त्याअनुषंगाने, शासन पत्रात नमुद केल्याप्रमाणे संस्थास्तरावर अंमलबजावणी करण्यात यावी. जेणे करून संबंधित शिष्यवृत्तीस पात्र असलेला विद्यार्थी शिष्यवृत्तीच्या लाभापासून वंचित राहणार नाही. याची दक्षता संस्था प्रमुख व प्राचार्य यांनी घ्यावी.

**(डॉ. मनोज भा. डायगव्हाणे)**
सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,
नागपूर

प्रत:- मा. संचालक, तंशिसं,म.रा.मुंबई यांचे कार्यालयाचे कार्यासन क्र.१८ यांना माहिती करिता मानार्थ सादर .

महाराष्ट्र शासन

# तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य.

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्र.१९६७, मुंबई ४०० ००१.

दूरध्वनी क्र.०२२-६८५९७४८६

ई-मेल -- desk18@dtemaharashtra.gov.in, वेबसाईट: http://www.dtemaharashtra.gov.in

तात्काळ : स्पीडपोस्ट/ई-मेलद्वारे

क्र.:- १८/तंशिसं/डीबीटी/विकाप/२०२५/ २४६

दिनांक:- २८/०८/२०२५

प्रति,
सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,
मुंबई/पुणे/नाशिक/छत्रपती संभाजीनगर/अमरावती/नागपूर

विषय:- मागासवर्गीय घटकातील विद्यार्थ्यांसाठी इतर मागास बहुल कल्याण विभागाच्या क्र. शिवृत्ती-२०२३/ प्र.क्र.१३५/प्र.क्र.२२१/शिक्षण दि. २०/०९/२०२४ रोजीच्या शासन शुध्दीपत्रकाची प्रभावी अमलबजावणी करण्याबाबत.

संदर्भ:- १. उच्च व तंत्र शिक्षण विभागाचे प्रत्र क्र. संकिर्ण-२०२५/प्र.क्र.५०/तांशि-४, दि.१८/०३/२०२५

२. मा. रविंद्र चव्हाण यांनी मा. ना. श्री. चंद्रकांत पाटील, मंत्री उच्च व तंत्रशिक्षण यांना उद्देशून लिहिलेले जा. क्र. १२२/२०२५, दि. ०४/०२/२०२५ रोजीचे पत्र.

३. इतर मागास बहुजन कल्याण विभाग, शासन शुध्दीपत्रक क्र. शिवृत्ती-२०२३/प्र.क्र.१३५/शिक्षण-१, दि. २०/०९/२०२४.

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने कळविण्यात येते की, मा. श्री. रविंद्र चव्हाण, विधानसभा सदस्य यांचे पत्र संदर्भीय क्र. १ नुसार संचालनालयास प्राप्त झाले असून इतर मागास बहुजन कल्याण विभाग, शासन शुध्दीपत्रक क्र. शिवृत्ती-२०२३/ प्र.क्र.१३५/शिक्षण-१, दि. २०/०९/२०२४ नुसार विमुक्त जाती भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांसाठी असलेली शिक्षण शुल्क व परीक्षा शुल्क प्रतिपूर्ती योजनाकरीता नॉन-क्रिमिलेअर प्रमाणपत्र बंधनकारक करणेबाबत मान्यता दिलेली आहे. परंतू, अद्यापही या आदेशाची अंमलबजावणी संबंधित शासकीय, अशासकीय व शासनमान्य खाजगी विनाअनुदानित व कायम विनाअनुदानित महाविद्यालय/तंत्रनिकेतन यांचे मार्फत होत नसल्याचे निदर्शनास आले आहे. याबाबत तपासून अवगत करावे असे नमुद केले आहे.

तरी याबाबत सर्व विभागीय कार्यालयांना कळविण्यात येते की, आपल्या अखत्यारीत येणाऱ्या सर्व संस्थांना संदर्भ क्र. ३ दि. २०/०९/२०२४ रोजीच्या शासन शुध्दीपत्रकानुसार अंमलबजावणी करण्याबाबत कळविण्यात यावे. याबाबत केलेल्या कार्यावाहीचा अहवाल या संचालनालयास तात्काळ पाठवावा.

सोबत: १. मा. रविंद्र चव्हाण, विधानसभा सदस्य यांचे पत्र.

२. दि. २०/०९/२०२४ रोजीचे शासन शुध्दीपत्र.

(डॉ. विनोद म. मोहितकर)
संचालक,
तंत्रशिक्षण संचालनालय, मुंबई.

प्रत. मा. अपर मुख्य सचिव, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, ४ था मजला, मुंबई-३२ यांना माहितीसाठी. (लक्षवेध-श्री. अजितकुमार थोरात, कक्ष अधिकारी)

06 FEB 2025 ७०तारीख-४ २७/०२/२५

# रविंद्र चव्हाण

कार्यकारी अध्यक्ष - भारतीय जनता पार्टी, महाराष्ट्र प्रदेश
विधानसभा सदस्य - १४३ डोंबिवली (जि. ठाणे)
माजी मंत्री, महाराष्ट्र राज्य

जा.क्र. १२२/२०२५, जा.क्र. मंत्री/उ.व तंत्र शि., .सं.कार्य/ पी.आय.पी./मुं./ 7887610 12-02-25 दिनांक : ०४-०२-२०२५

प्रति,

मा.ना.श्री. चंद्रकांत (दादा) सरस्वती बच्चू पाटील,
मंत्री, उच्च व तंत्रशिक्षण,
महाराष्ट्र राज्य,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.

अ.मु.स. उच्च व तंत्र शिक्षण यांचे कार्यालय क्र. 7887610 दि. 17/02/25

विषय :- मागासवर्गीय घटकातील विद्यार्थ्यांसाठी इतर मागास बहुजन कल्याण विभागाच्या क्र.शिवृत्ती-२०२३/प्र.क्र.१३५/प्र.क्र.२२१/ शिक्षण-१, दिनांक २०.०९.२०२४ रोजीच्या शासन शुध्दीपत्रकाची प्रभावी अंमलबजावणी करण्याबाबत.

महोदय,

राज्यातील शासकीय, अशासकीय अनुदानित व शासन मान्यता प्राप्त खाजगी विनाअनुदानित व कायम विनाअनुदातित महाविद्यालये / तंत्रनिकेतने आणि शासकीय विद्यापीठात विनाअनुदानित तत्वावर सुरु असलेल्या निवडक व्यावसायिक अभ्यासक्रमांसाठी प्रवेश घतलेल्या विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांसाठी असलेली शिक्षण शुल्क व परीक्षा शुल्क प्रतिपूर्ती योजनाकरिता सन २०१७-२०१८ या शैक्षणिक वर्षापासून रुपये ६.०० लक्ष वरुन रुपये ८.०० लक्ष करण्याची अट रद्द करुन त्याऐवजी नॉन-क्रिमीलेयर प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक करण्यास शासनाच्या इतर मागास बहुल कल्याण विभागाच्या क्र.शिवृत्ती-२०२३/प्र.क्र.१३५/प्र.क्र.२२१/शिक्षण-१, दिनांक-२०.०९.२०२४ रोजीच्या शासन शुध्दीपत्रकान्वये मान्यता दिलेली आहे.

परंतु, अद्यापही या आदेशाची अंमलबजावणी संबंधित शासकीय, अशासकीय व शासनमान्य खाजगी विनाअनुदानित व कायम विनाअनुदानित महाविद्यालये / तंत्रनिकेतन यांचे मार्फत होत नसल्याचे निदर्शनास आले आहे. ही बाब मागासवर्गीय घटकातील विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांसाठी अन्यायकारक असल्यामुळे विद्यार्थी हितास्तव उक्त आदेशांची तातडीने प्रभावी अंमलबजावणी सुरु करण्याकरिता सर्व संबंधितांना आपल्या स्तरावरून आदेश द्यावेत, अशी आपणांस विनंती आहे.

आपला,

(रविंद्र चव्हाण)

कार्यालय : सी. डी. ओ. बॅरक नं. १, वसंतराव भागवत चौक, योगक्षेमसमोर, नरिमन पॉईंट, मुंबई - ४०० ०२०. दूरध्वनी : ०२२-२२०२२०५०/२२०४८६८७
मतदारसंघ कार्यालय : जाणता राजा स्वातंत्र्यवीर सावरकर उद्यान, वीर सावरकर रोड, डोंबिवली पूर्व, जि. ठाणे - ४२१ २०१.
* Web. : www.ravindrachavan.in * E-mail : ravindrachavan.mla@gmail.com

विमुक्त जाती भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांसाठी असलेली शिक्षण शुल्क व परीक्षा शुल्क प्रतिपूर्ती योजनाकरिता नॉन -क्रिमीलेअर प्रमाणपत्र बंधनकारक करणेबाबत.

महाराष्ट्र शासन
इतर मागास बहुजन कल्याण विभाग,
शासन शुध्दीपत्रक क्रमांक : शिवृत्ती-२०२३/प्र.क्र.१३५/शिक्षण-१
मोती महल, २ रा मजला, १९५,जे. टाटा रोड, चर्चगेट,मुंबई-४०००२०
दिनांक : २० सप्टेंबर, २०२४.

संदर्भ- १) शासन निर्णय, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, क्र. इबीसी-२०१६/प्र.क्र.२२१/ शिक्षण-१, दिनांक ३१ मार्च, २०१६
२) शासन निर्णय, इतर मागास बहुजन कल्याण विभाग, क्रमांक: इबीसी-२०१७/ प्र.क्र.२७/ शिक्षण, दिनांक ०१ जानेवारी, २०१८

शासन शुध्दीपत्रक

संदर्भाधीन शासन निर्णय क्र.२ येथील परिच्छेद क्र.१ मध्ये खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

"राज्यातील शासकीय, अशासकीय अनुदानित व शासन मान्यता प्राप्त खाजगी विनाअनुदानित व कायम विनाअनुदानित महाविद्यालये/तंत्रनिकेतने आणि शासकिय विद्यापीठात विनाअनुदानित तत्वावर सुरु असलेल्या निवडक व्यावसायिक अभ्यासक्रमांसाठी प्रवेश घेतलेल्या विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांसाठी शैक्षणिक शुल्क प्रतिपूर्ती योजनेंतर्गत पालकांची वार्षिक उत्पन्न मर्यादा सन २०१७-१८ या शैक्षणिक वर्षापासून रुपये ६.०० लक्ष वरुन रुपये ८.०० लक्ष करण्यास शासनाची मान्यता देण्यात येत आहे"

सदर शासन निर्णयातील उपरोक्त मजकुरा ऐवजी खालीलप्रमाणे वाचावे.

"राज्यातील शासकीय, अशासकीय अनुदानित व शासन मान्यता प्राप्त खाजगी विनाअनुदानित व कायम विनाअनुदानित महाविद्यालये/तंत्रनिकेतने आणि शासकिय विद्यापीठात विनाअनुदानित तत्वावर सुरु असलेल्या निवडक व्यावसायिक अभ्यासक्रमांसाठी प्रवेश घेतलेल्या विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांसाठी असलेली शिक्षण शुल्क व परीक्षा शुल्क प्रतिपूर्ती योजनाकरिता उत्पन्नाची अट रद्द करण्यात येत असून त्याऐवजी नॉन-क्रिमीलेयर प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक करण्यास शासनाची मान्यता देण्यात येत आहे."

सदर शासन शुध्दीपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक संकेतांक २०२४०९२३१५५४३७४८३४ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

PRAKASH SHRIDHAR DHAWLE

(डॉ. प्रकाश धावले)
कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रति,
१) मा.राज्यपाल महोदयांचे सचिव, राजभवन, मुंबई.
२) मा. मुख्यमंत्री महोदयांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.